शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

व्यावसायिक अभ्यासक्रम (विधी, बी.एड. व बी.पीएड. वगळून) आणि पारंपारिक अभ्यासक्रमांच्या (कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा) प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संदर्भ क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. ४५९/विशि-३ दिनांक १५/०९/२०१७ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आदेशान्वये

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 105
दि. 18 SEP 2017

**महाराष्ट्र शासन**

**ई-मेल द्वारे**
**अतितात्काळ/महत्वाचे**

क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. ४५९/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक -- १५/०९/२०१७.

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय - शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ मध्ये विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून प्रवेश प्रक्रियेची मुदत वाढविण्याबाबत.

महोदय,

शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, काही विद्यापीठांमध्ये प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यानंतरसुध्दा अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत.

यासंदर्भात मला आपणांस असे कळविण्याचे निदेश आहेत की, आपल्या विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयांमध्ये, व्यावसायिक अभ्यासक्रम (विधी, बी.एड. व बी.पी.एड. वगळून) आणि पारंपारिक अभ्यासक्रमाकरिता (कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा) कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

तसेच या सर्व विद्यार्थ्यांचे बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार १८० शैक्षणिक दिवस भरतील याची दक्षता सर्व अकृषी विद्यापीठांनी घ्यावी, ही विनंती.

आपली,

१५/०९/२०१७

( ज. आ. खवणेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव -

१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.